चार मेट्रो, चार रेल्वे स्थानके 'ट्रॅव्हलेटर'ने जोडली जाणार

# मोनोला रेल्वे-मेट्रोची जोडणी

म. टा. प्रतिनिधी

**मुंबई :** आर्थिकदृष्ट्या तोट्यात असलेल्या मोनोरेल्वेवर प्रवासी संख्या वाढविण्यासाठी तिला उपनगरीय रेल्वे आणि मेट्रोमार्गाशी जोडणी देण्यात येणार आहे. उपनगरीय रेल्वेच्या चेंबूर, वडाळा, करी रोड आणि महालक्ष्मी स्थानकांशी, तसेच मेट्रो ३चे महालक्ष्मी, मेट्रो ४चे वडाळा स्थानक आणि मेट्रो २ मार्गिकेशी मोनोरेल सेवा जोडण्याचा विचार प्रत्यक्षात आणण्याचा विचार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) करत आहे. यातील मोनोरेल्वेच्या संत गाडगे महाराज चौक स्थानकाची मेट्रो ३ च्या आणि उपनगरीय रेल्वेच्या महालक्ष्मी स्थानकाशी 'ट्रॅव्हलेटर'च्या (सरकता मार्ग)माध्यमातून जोडणी देण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ६३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक या मोनोरेल मार्गिकेची लांबी २० किमी असून यावर सुमारे १७ स्थानके आहेत. मोनो सेवा सुरू केली तेव्हा प्रति ताशी, प्रति दिशा ७२०० प्रवासी प्रवास करतील, अशी अपेक्षा होती. मात्र सद्यस्थितीत मोनो मार्गिकेवर संपूर्ण दिवसभरात केवळ १५ ते १८ हजार प्रवासी प्रवास करत आहेत.

मोनो रेल्वे उपनगरीय रेल्वे स्थानकांशी न जोडल्याने अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळेच प्रवाशांची संख्या वाढविण्यासाठी उपनगरीय रेल्वे आणि मेट्रो मार्गिकेशी मोनो जोडण्याचे नियोजन 'एमएमआरडीए'ने केले आहे.

सध्या मोनो मार्गिकेच्या शेवटच्या स्थानकापासून उपनगरीय रेल्वेचे महालक्ष्मी स्थानक ७०० मीटर अंतरावर आहे. एवढे अंतर चालणे प्रवाशांना शक्य होत नाहीत. त्यामुळे प्रवासी मोनो रेल्वेचा पर्याय वापरत नाहीत. मेट्रो ३ आणि उपनगरीय रेल्वेच्या महालक्ष्मी स्थानकाला 'ट्रॅव्हलेटर'द्वारे जोडणी दिल्यास कुलाबा, कफ परेड, नरीमन पॉइंट आणि दक्षिण मुंबईतून वडाळा, चेंबूर भागात जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. मेट्रो अथवा उपनगरीय रेल्वेतून उतरून मोनोद्वारे पुढील प्रवास करणे शक्य होणार आहे. त्यातून मोनोच्या प्रवासी संख्येत वाढ होण्याची आशा 'एमएमआरडीए'ला आहे.

'एमएमआरडीए'कडून मोनोच्या संत गाडगे महाराज चौक स्थानकाची महालक्ष्मी उपनगरीय रेल्वे आणि मेट्रो ३ स्थानकाला 'एलिव्हेटेड ट्रॅव्हलेटर'च्या माध्यमातून जोडणी देण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ३२५ मीटर लांबीचे फूट ओव्हर ब्रिज उभारण्यात येणार आहे. त्यावर सुमारे २६५ मीटर लांबीचा ट्रॅव्हलेटर उभारण्यात येणार आहे. हा ट्रॅव्हलेटर ७ मीटर रुंद असेल. दोन्ही दिशेकडील बाजूसाठी ८ ट्रॅव्हलेटर बसविण्यात येणार आहेत. तसेच या ट्रव्हलेटरपर्यंत पोहचणे प्रवाशांना सहज शक्य व्हावे याकरिता एकूण ४ सरकते जिने आणि ७ उद्‌वाहन बसविण्यात येणार आहेत. यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्याकरिता निविदा जाहीर केल्या आहेत. तसेच या कामासाठी ६३ कोटी ६८ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. कंत्राटदाराच्या नियुक्तीनंतर एका वर्षात ट्रॅव्हलेटरची उभारणी पूर्ण होणार आहे. त्यामुळे २०२४ मध्ये हा ट्रॅव्हलेटर प्रवाशांसाठी सुरू होण्याची चिन्हे आहेत.



**मेट्रो स्थानकांशी जोडणी**

| मोनो स्थानक | मेट्रो स्थानक |
|---|---|
| आर. सी. मार्ग | मेट्रो २ बी |
| भक्ती पार्क | मेट्रो ४ वडाळा स्थानक |
| महालक्ष्मी | संत गाडगे महाराज चौक |

**रेल्वे स्थानकांशी जोडणी**

| मोनो स्थानक | रेल्वे स्थानक |
|---|---|
| चेंबूर | चेंबूर |
| वडाळा | वडाळा |
| करी रोड | लोअर परेल |
| महालक्ष्मी | संत गाडगे महाराज चौक |

